# देवगिरी नागरी सहकारी बँक लि.औरंगाबाद

मुख्य कार्यालय : अर्थ कॉम्प्लेक्स, केसरसिंगपुरा, अदालत रोड, औरंगाबाद.
दूरध्वनी क्र.(०२४०) २३३४१२१, २२४०२००, फॅक्स क्र.(०२४०)२३४७०००,
**Website** : www.deogiribank.com **E-mail** : admindept@deogiribank.com
(नोंदणी क्रमांक : ए.जी.डी./बी.एन.के./२१५/८४/दि.२४ जानेवारी १९८४)

संहति: कार्य साधिका

## विशेष सर्वसाधारण सभेची सूचना

(फक्त सभासदांसाठी)

देव/मु.का./प्रशा/विशेष सर्वसाधारण सभा/१०८२/२०२१-२२ दि.०७/०९/२०२१

बँकेच्या सर्व सन्माननीय सभासदांना कळविण्यात येते की, कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर शासनाच्या निर्देशांचे पालन करणेकरीता व मा.सहकार खात्याच्या दि.०३/०९/२०२१ रोजीच्या परिपत्रकातील निर्देशानुसार **बँकेची विशेष सर्वसाधारण सभा रविवार, दि.२६/०९/२०२१ रोजी सकाळी ठीक ११.०० वा.** व्हिडिओ कॉन्फरन्स (VC) द्वारे आयोजित केली असल्याकारणाने सभासदांची प्रत्यक्ष उपस्थिती अपेक्षित नाही. **सदर सभेस ऑनलाईन उपस्थित राहावे, ही विनंती.**

### सभेपुढील विषय :

**१. संचालक मंडळाने बँकेच्या उपविधी (Bye-Laws) मध्ये सुचविलेल्या दुरूस्तीस मान्यता देणे बाबत.**

**२. बँकेच्या इमारत निधी व जनरल रिझर्व (राखीव निधी) मधून डेफर्ड टॅक्स ॲसेट खात्यावर निधी हस्तांतरण/वर्ग करण्यास मान्यता देणे बाबत.**

**३. बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदी नियुक्ती करणेसाठी रिझर्व बँकेस पाठविलेल्या प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देणे बाबत.**

**४. मा. अध्यक्षांच्या अनुमतीने ऐनवेळी येणारे विषय.**

**स्थळ : औरंगाबाद**
**दिनांक : ०७/०९/२०२१**

मा.संचालक मंडळाच्या आदेशावरून
**प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी**

### विशेष सूचना :

१) विशेष सर्वसाधारण सभेस उपस्थित राहण्यासाठी, सभासदांना त्यांच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर SMS द्वारे व ई-मेल आयडी वर **लॉगीन आयडी आणि पासवर्ड** पाठविण्यात येतील. ज्या सभासदांनी आपला ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक नोंदविलेला नसेल त्यांनी दिनांक २०/०९/२०२१ पर्यंत नजीकच्या शाखेत नोंदणी करावी. जे सभासद नोंदणी करतील त्यांना दि. २१/०९/२०२१ पर्यंत लॉगीन आयडी व पासवर्ड पाठविण्यात येतील.

२) इंटरनेट सेवा उपलब्ध असलेल्या संगणक/लॅपटॉप/स्मार्टफोन याद्वारे सभासद ह्या विशेष सर्वसाधारण सभेस उपस्थित राहू शकतील.

३) विशेष सर्वसाधारण सभेच्या कामकाजाची प्रक्रिया दि.२६/०९/२०२१ रोजी पूर्ण होईल, त्याबाबतचा अधिक तपशील खालील प्रमाणे आहे :-

अ) दि.२६/०९/२०२१ रोजी सभेच्या निर्धारीत वेळेपूर्वी ३० मिनिटे आधी म्हणजेच सकाळी १०.३० पासून सभासदांना लॉगीन करता येईल.

ब) दि.२६/०९/२०२१ रोजी सर्वप्रथम सभेच्या विषय पत्रिकेतील सर्व विषय सभेपुढे मांडण्यात येतील.

क) दि.२६/०९/२०२१ रोजी सकाळी ११.०० ते सायं.५.०० या कालावधीत, विशेष सर्वसाधारण सभेत सादर करण्यात आलेल्या ठरावांवर सभासदांनी त्यांच्या लिंकवर/संकेतस्थळावर मतनोंदणी करावयाची आहे. ठराव मंजुरीबाबतचे निर्णय मत मोजणी पूर्ण झाल्यानंतर त्याच लिंकवर/संकेतस्थळावर जाहीर करण्यात येईल.

४) मा.सहकार खात्याने निर्गमित केलेल्या दि.०३/०९/२०२१ रोजीच्या पत्रानुसार, व्हिडिओ कॉन्फरन्सींग (VC)/ऑदर ऑडिओ व्हिज्युअल मिन्स (OAVM) द्वारे विशेष सर्वसाधारण सभेच्या आयोजनासाठी, तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञ संस्थेची सेवा घेण्याची सूचना केली आहे. त्या अनुषंगाने, बँकेने नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (NSDL) यांची विशेष सर्वसाधारण सभेच्या आयोजनासाठी व विशेष सर्वसाधारण सभेत मांडण्यात येणाऱ्या ठरावांवर ऑनलाईन पद्धतीने मतनोंदणीचे आयोजन करण्यासाठी नेमणूक केली आहे. काही अनपेक्षित परिस्थितीत उदा.तांत्रिक कारणांमुळे सदर विशेष सर्वसाधारण सभेचे कामकाज खंडीत झाल्यास, तांत्रिक त्रुटीचे निवारण झाल्यानंतर त्याच लिंकवर लगेचच सभेचे कामकाज सुरु केले जाईल याची सभासदांनी कृपया नोंद घ्यावी.

५) सभासदांना लॉगीनबाबत काही तांत्रिक अडचणी आल्यास evoting@nsdl.co.in या ई-मेल आयडीवर अथवा १८००-१०२०-९९० या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. त्यांचेकडून लॉगीन अथवा पासवर्डबाबत काही प्रश्न/अडचणी असतील तरच त्या सोडविल्या जातील. सभासदांच्या इंटरनेट कनेक्शनबाबत काही अडचणी असतील, तर त्या सोडविणे शक्य होणार नाही. तसेच सभासदांना बँकेसंदर्भात अथवा विषय पत्रिकेबाबत प्रश्न असतील तर त्यांचे निराकरण, या एजन्सीमार्फत दिलेल्या क्रमांकावर व मेल आयडीवर होणार नाही.

६) सभेच्या नियोजित वेळेत म्हणजेच सकाळी ११.०० वाजेपर्यंत गणपूर्ती न झाल्यास सभा तहकुब केली जाईल व तहकुब झालेली सभा त्याच दिवशी व्हिडिओ कॉन्फरन्सींग (VC) द्वारे सकाळी ११.३० वाजता घेण्यात येईल. त्या सभेस गणपूर्तीची व वेगळ्या सूचनेची आवश्यकता राहणार नाही. जेवढे सभासद, बँकेने या सभेसाठी पाठविलेल्या अधिकृत लिंकवर सभेस उपस्थित राहतील त्यांची उपस्थिती गणसंख्या मोजताना त्यावेळी ग्राह्य धरली जाईल.

७) भाग प्रमाणपत्रातील नाव, पत्ता अथवा वारसदार यात बदल असल्यास त्यासंबंधीचे पत्र बँकेच्या शेअर्स विभाग, सेवा शाखा, मुकूंदवाडी, औरंगाबाद येथे पाठविण्यात यावेत. त्यानुसार योग्य नोंद करणे शक्य होईल.

**टिप : उपविधीतील दुरूस्तीची प्रत बँकेच्या सर्व शाखांमध्ये दिनांक ०७/०९/२०२१ पासून उपलब्ध राहील. कृपया सन्माननीय सभासदांनी आपली प्रत नजीकच्या शाखेतुन प्राप्त करून घ्यावी.**